# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईदर- वसई-विरार यांचे कार्यालय

रामनगर सृष्टी,मिरारोड पूर्व ता.जि.ठाणे

फोन.नं. ०२२-२९४५१००१

Mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेस नोट क्र ९८** **दिनांक- १४/०४/२०२१**

**६ वर्षीय अल्पवयीन चिमुकलीवर, लैंगिक अत्याचार करुन पळ काढणा-या अज्ञात नराधमाचा १२ तासाचे आत शोध घेऊन गुन्हा उघडकिस आणुन आरोपीतास अटक करण्यास वालीव गुन्हेप्रकटीकरण शाखेस यश.**

वालीव पोलीस ठाणे येथे एक इसमाने फोनव्दारे माहिती दिली की, अंधारात एक मुलगी बेथरलेल्या स्थितीत व रक्ताच्या थारोळयात पडलेली आहे अशी माहिती मिळताच संबंधित ठिकाणी प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस घटनास्थळी दाखल झाले. दरम्यान काळात पिडीत मुलगी हिची आई हीने पोलीस ठाण्यात येवुन फिर्याद दिली की, पीडीत मुलगी ही घराचे बाहेर गल्लीमध्ये खेळत असतांना तिचे बालवयाचा फायदा घेऊन तिला कोणीतरी अज्ञात इसमाने पळवुन नेवुन तिचेवर शारीरिक अत्याचार करुन जबरी संभोग केला असलेबाबत संशय आहे.त्यावरून तत्काळ अज्ञात आरोपीत विरुध्द वालीव पोलीस ठाणे गुन्हा रजि नंबर ३८५/२०२१ भादविस कलम ३६३,३७६ सह बा.लै.अ.सं. २०१२ चे कलम ४,८ गुन्हा दाखल करण्यात आले.

मा.वरीष्ठांचे मार्गदर्शनाने सदर घटनेची गांभीर्य लक्षात घेऊन गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी तपासाची चक्रे फिरवली असता माहीती समोर आली कि, अज्ञात नराधम आरोपी हा पिडीत मुलगी हीस चॉकलेट देण्याचा बहाणा करुन घेवुन गेला होता. बाजुचे दुकानदाराकडेस चौकशी करुन मिळालेल्या अज्ञात आरोपीताचे वर्णनाप्रमाणे आरोपीत नामे. पप्पु रामनाथ सिंग,वय ३५ वर्षे रा. वालीव गाव, वसई पुर्व यास ताब्यात घेण्यात आले. त्यास विश्वासात घेवुन विचारपुस केली असता त्याने सदर कृत्य केले असल्याची कबुली दिली आहे. त्यास गुन्हयानंतर काही तासातच अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास श्री. अमोल मांडवे, सहाय्यक पोलीस आयुक्त, तुंळीज विभाग हे करीत आहे.

वरील कामगिरी श्री.प्रशांत वाघुंडे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-३ विरार, श्री. अमोल मांडवे, सहाय्यक पोलीस आयुक्त, तुंळीज विभाग, वालीव पोलीस ठाणे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री.विलास चौगुले, पोलीस निरीक्षक श्री.चंद्रकांत सरोदे, पोलीस निरीक्षक श्री.दादासाहेब करांडे, पोलीस निरीक्षक श्री. बडाख यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण शाखेचे, सपोनि/ ज्ञानेश फडतरे, पोहवा/८१३योगेश देशमुख, पो.हवा./१२८ मुकेश पवार, पो.ना./१३३२ किरण म्हात्रे, पो.ना./१८४८ अनिल सोनवणे, पो.ना./३७३ सतिष गांगुर्डे, पो.ना./१०७७ राजेंद्र फड , पो.अंम./२२४६ विनेश कोकणी, पो.अंम./१४९ बालाजी गायकवाड पो.अंम./३२६ गजानन गरीबे यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.

Scanned with CamScanner